# युवाराष्ट्र दर्शन

RNI No. MAHMAR/2008/26657

E-mail : yuvarashtradarshan.com

नागपूर, मंगळवार, दिनांक ३ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष १७ ■ अंक ३४० ■ पाने ८ ■ किंमत रु. २/- वितरण खर्च रु.१ = एकूण ३ रुपये


## संपादकीय

### महपौरपदाचा घोळ संपला

यंदाच्या महापालिका निवडणुकीत सर्वात जास्त जागा जिंकून भाजप आघाडीवर आहे. त्यांच्याकडे एकहाती सत्ता आहे. तरीही महापौर कोण होणार? अशी मागील पंधरा दिवसांपासून चर्चा सुरू होती. भाजपचा प्रत्येक आमदार महापौर आमच्या मतदारसंघाचा असावा यासाठी त्यांच्यात चढाओढ सुरू होती. सर्वात जास्त चढाओढ पूर्व नागपूरचे आमदार कृष्णा खोपडे यांच्यात होती. त्यात दक्षिण नागपूरचे आमदार मोहन मते देखील मागे नव्हते. प्रत्येकाने आपल्या नगरसेवकांची नावे पक्षश्रेष्ठीला दिली होती. शेवटी देवाभाऊ ज्याला म्हणतील तोच महापौर असे ठरविण्यात आले. महापौर निवडीसाठी नितीन गडकरी आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात तीनदा बैठकी झाल्या. मात्र, महापौरांच्या नावावर एकमत होत नव्हते. त्यानंतर गडकरी यांच्या पुढाकाराने निता ठाकरे यांचे नाव निश्चित झाले होते. तरीही महापौर पदावरून अंतर्गत धुसफूस सुरूच होती. निता ठाकरे महापौर होणार हे जवळपास निश्चित झाले होते. परंतु, त्यांच्या नावाची घोषणा होणे बाकी होते. शेवटी सोमवारी नागपूरच्या महापौरपदी निता ठाकरे यांची निवड झाल्याची घोषणा करण्यात आली. आता स्थायी समितीच्या अध्यक्षपदी कोण? असा प्रश्न निर्माण झाला आहे. मात्र, स्थायी समिती अध्यक्षाचे नाव जवळपास निश्चित झाल्याची माहिती आहे. शिवानी दाणी यांच्याकडे महापालिकेच्या तिजोरीची चावी सोपविण्यात येणार असल्याची माहिती आहे. शिवानी दानी अनेक वर्षांपासून भाजपमध्ये सक्रिय असून अनेक जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या आहेत. त्यातच त्या देवेंद्र फडणवीस यांच्या मतदारसंघातील असून त्यांची देवाभाऊंशी जवळीक देखील आहे. त्यामुळे स्थायी समिती अध्यक्षाचा मार्ग देखील लवकरच मोकळा होणार आहे.

## नागपूरच्या महापौरपदी निता ठाकरे

### उपमहापौरपदी लिला हाथीबेड

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
नागपूर, दि. २

नागपूरच्या महापौरपदी प्रभाग २८ दक्षिण नागपूरच्या नगरसेविका निता ठाकरे यांची निवड करण्यात आली असून, उपमहापौरपदी लिला हातीबेड यांची निवड करण्यात आली. ठाकरे आणि हाथीबेड यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले असून येत्या ६ फेब्रुवारी सुरेश भट सभागृहात निवडणूक होणार आहे.

महापौरपदाच्या निवडणुकीसाठी आज अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया महापालिकेच्या स्थायी समिती सभागृहात पार पडली. निता ठाकरे यांनी महापौरपदासाठी मनपा सचिवांकडे दोन नामांकन अर्ज दाखल केले. उपमहापौरपदासाठी हाथीबेड यांनीही दोन अर्ज दाखल केले. याप्रसंगी भाजपचे शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी, आमदार मोहन मते, कृष्णा खोपडे, गटनेते बाल्या बोरकर, नगरसेवक पिंटू झलके आदी नगरसेवक उपस्थित होते.



निता ठाकरे



लिला हाथीबेड

निता ठाकरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल करताच त्या शहराच्या ५५ व्या आणि ८ व्या महिला महापौर होणार आहेत. निता ठाकरे या एमए, बीएड झाल्या असून गृहिणी आहेत. यापूर्वी त्या २००२, २००७, २०१२ मध्ये नगरसेविका म्हणून निवडून आल्या होत्या. २०१७ च्या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला होता. आता त्या दक्षिण नागपुरातील प्रभाग २८ मधून निवडून आल्या आहेत. भाजपच्या पदाधिकारी म्हणून त्यांनी विविध जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. त्या महिला आयोगाच्या सदस्या देखील होत्या. त्यांच्या उमेदवारीसाठी दक्षिण नागपूरचे आमदार मोहन मते यांनी आग्रह धरला होता. यासंदर्भात तीन दिवसांपूर्वी केंद्रीयमंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात झालेल्या चर्चेत त्यांचे नाव चर्चेत होते. सोमवारी त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

**उपमहापौराची नाट्यमय निवड**

उपमहापौरपदासाठी प्रभाग १९ चे ज्येष्ठ नगरसेवक ॲड. संजय बालपांडे यांचे नाव निश्चित झाले होते. मात्र, बालपांडे यांनी केंद्रीयमंत्री गडकरी यांची भेट घेऊन उपमहापौरपद स्विकारण्यास नकार दिला होता. त्यामुळे ऐनवेळी प्रभाग २९ च्या नगरसेविका लिला हाथीबेड यांच्या उपमहापौरपदाची सूत्रे सोपविण्यात आली. त्यामुळे आता दक्षिण नागपूरला महापौर आणि उपमहापौर अशी दोन पदे मिळणार आहेत.

**ठाकरे विरुद्ध ठाकरे अशी लढत होणार**

काँग्रेसचे ३४ सदस्य असून महापौरपदाची निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे. काँग्रेसकडून सोमवारी प्रभाग ११ च्या नगरसेविका स्नेहल ठाकरे यांना उमेदवारी अर्जदाखल केला. त्यामुळे आता निता ठाकरे विरुद्ध लिला ठाकरे अशी लढत होणार आहे. काँग्रेसने उपमहापौरपदासाठी विवेक निकोसे यांना उमेदवारी दिली असून त्यांनीही आपला अर्जदाखल केला आहे.

## ॲडव्हांटेज विदर्भमध्ये रोजगारांच्या संधी

### २३ देशातील राजदूत येणार



युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
नागपूर, दि. २

रातुम नागपूर विद्यापीठाच्या परिसरात ६ ते ८ फेब्रुवारीदरम्यान होणाऱ्या ॲडव्हांटेज विदर्भ २०२६ खासदार आद्योगिक महोत्सवातील आंतरराष्ट्रीय व्यावसायिक परिषदेसाठी पहिल्यांदाच २३ हून अधिक देशांचे राजदूत व व्यापार प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. या उपक्रमातून विदर्भातील आणि स्थानिक उद्योगांना निर्यातीच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील अशी माहिती असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंटचे अध्यक्ष आशिष काळे यांनी वार्तापरिषदेत दिली.

काळे यांनी पत्रकारांना सांगितले, विदर्भाच्या औद्योगिक विकासाला आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यासपीठ मिळविण्यासाठी ॲडव्हांटेज विदर्भ आहे. विकासाला बख या संकल्पनेवर आधारित हा महोत्सव भारताच्या औद्योगिक नकाशावर विदर्भाला एक सक्षम व उदयोन्मुख केंद्र म्हणून अधोरेखित करणार आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन ७ फेब्रुवारीला सकाळी ११ वाजता केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते होणार आहे.

सायंकाळी पाच वाजता दक्षिण आफ्रिका, लॅटिन अमेरिका, कॅरिबियन, रशिया, चीन त्याचप्रमाणे आफ्रिकी देशांवरिल विशेष सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. या सत्रांमध्ये संबंधित देशांचे राजदूत अथवा व्यापार प्रतिनिधी त्यांच्या देशातील गरजा, आयातक्षम वस्तू आणि व्यवसायाच्या संधीबाबत विदर्भातील उद्योजकांना मार्गदर्शन करणार आहेत. या परिषदेत रशिया, चीन, ब्राझील, इजिप्त, टोगो, गयाना, बेनिन, उरुग्वे, नायजेरिया, झांबिया आणि व्हेनेझुएला यांच्यासह २३ देशांचा सहभाग राहणार आहे. सध्या या देशांमध्ये भारतातून विशेषतः विदर्भातून तांदूळ, वीज वहन मनोरे, सूत, आणि पोलाद निर्यात केल्या जाते. या वस्तूंच्या निर्यातीत वाढ होण्यासोबतच नव्या उत्पादनांना देखील संधी मिळणार आहे.

वार्तापरिषदेला अशोक गोयल, अनूप खंडेलवाल, संजय गुप्ता, राजेश बागडी, राजेश रोकडे, रिना सिन्हा आदी उपस्थित होते.

## मुंबईच्या महापौर निवडणुकीत राज' फॅक्टर संपला

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
मुंबई, दि. २

मुंबई महापालिकेच्या सत्तेचा सोपान सर करण्यासाठी महायुतीने कंबर कसली असताना, मनसेचे इंजिन भाजपच्या डब्याला जोडलं जाणार का? या प्रश्नाने गेले दोन दिवस मुंबईचं राजकीय वातावरण तापलं होतं. सत्ताधाऱ्यांकडून मनसेला रेड कार्पेट अंथरलं जात असतानाच, राज ठाकरे यांनी आपल्या खास शैलीत या प्रस्तावाचा 'गेम' केला आहे. 'मी सांगतोय ना, भाजपसोबत जाणार नाही,' या राज ठाकरेंच्या एका वाक्याने युतीच्या सर्व शक्यतांना सध्या तरी सुरुंग लावला आहे. शेवाळेंचं निमंत्रण अनब मनसेची भूमिकामहापौर निवडीच्या हालचालींना वेग आला असून भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेचे नेते महापालिका आयुक्तांच्या भेटीगाठी घेत आहेत.

## चीनपाकिस्तानच्या मुद्द्यावरून संसदेत गदारोळ

### राहुल गांधी संसदेत उचलला मुद्दा

वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. २



लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर चर्चा सुरू असताना काँग्रेसचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी डोकलाम आणि चीनविषयी केलेल्या उल्लेखामुळे सभागृहात एकच गोंधळ उडाला. माजी लष्करप्रमुख नरवणे यांच्या अप्रकाशित पुस्तकाचा संदर्भ दिल्याने सरकारने आक्षेप घेतला आहे.

लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर धन्यवाद प्रस्तावावर चर्चा सुरू असताना राहुल गांधी बोलायला उभे राहिले आणि सभागृहात एकच गोंधळ उडाला. राहुल गांधी यांनी भाषणाच्या सुरुवातीलाच माजी लष्करप्रमुख मनोज नरवणे यांच्या आत्मचरित्रातील एक संदर्भ दिला.

या उल्लेखात डोकलाम आणि चीनचा संदर्भ असल्याने सत्ताधाऱ्यांकडून आक्षेप घेण्यात आला. राहुल गांधी म्हणाले की, नरवणे यांच्या पुस्तकात डोकलाममध्ये चार चीनी टँक भारताच्या हद्दीत येण्याच्या अगदी जवळ पोहोचले होते असा उल्लेख आहे. हे मी बनवून सांगत नाही. जे लिहिले आहे, तेच वाचतोय. यावरून कोण देशभक्त आणि कोण नाही हे समजले असेही गांधी यांनी सांगितले.

**ठोस पुरावा द्या : बिर्ला**

मात्र असे बोलताच संरक्षणमंत्री राजनाथसिंह उभे राहिले. त्यांनी स्पष्टपणे विचारलेकी, ज्या पुस्तकाचा उल्लेख केला जात आहे, ते पुस्तक प्रकाशित झाले आहे की, नाही हे आधी सांगावे. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनीही राहुल गांधींना नियमांची आठवण करून दिली आणि ऑथेंटिक पुरावा असेल तर सदनात मांडावा असेही ते म्हणाले.

त्यावर राहुल गांधींनी हे शंभर टक्के खरे असल्याचे सांगितले. नरवणे यांच्या पुस्तकात पंतप्रधान आणि संरक्षणमंत्र्यांचा थेट उल्लेख असल्याचा दावा केला.

त्यावर गृहमंत्री अमित शाह यांनी हस्तक्षेप करीत सांगितले की, हा उल्लेख कोणत्याही प्रकाशित पुस्तकाचा नाही. एका पुस्तकातील लेखाचा उल्लेख आहे. पुस्तक काहीही छापू शकते. नरवे यांनी असे विधान केल्याचे आम्हाला माहीत नाही असेही शहा म्हणाले.

## चारचाकी वाहनातून गांजाची

### तस्करी करणाऱ्यांना अटक

नागपूर, दि. २

इनोवा कारमधून गांजाची तस्करी करण्याच्या प्रयत्नात असलेल्या चौघांना युनिट ५ च्या पथकाने अटक करून त्यांच्या ताब्यातून सव्वा लाखांचा गांजा आणि कार असा ६ लाख ४८ हजाराचा मुद्देमाल जप्त केला.

फैजान फिरोज अंसारी (२६) गुजरी बाजार, कामठी, अहमर अहमद खान (३२) रुईगंज कामठी, मो. शाहीद अनवारुल हक (२९) इमली बाग मैदान, जुनी कामठी आणि फिरदोस खान नसीम खान (४०) कोळसा टाल, कामठी अशी या तस्करांची नावे आहेत.

युनिट ५ चे पथक नागपूर ते भंडारा मार्गावरील कापसी (बु) गावासमोर पॅट्रोलिंग करीत होते. सकाळी ३.५० च्या सुमारास चारही तस्कर हे एमएच ३१ सीआर ३७४७ क्रमांकाच्या इनोवा कारने कामठीकडे जात होते.

पोलिसांनी कारला अडवून झडती घेतली असता ५ किलो गांजाची पाकिटे मिळून आली. पोलिस पथकाने या तस्करांची विचारपूस केली असता काटाबांजी (ओरिसा) येथील रवीभाई नावाच्या इसमाकडून माल आणल्याची कबुली दिली. पोलिसांनी पाच किलो गांजा, कार, तीन मोबाईल, रोख २३८० रुपये असा ६ लाख ४८ हजाराचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी पारडी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवून पुढील कारवाईसाठी मुद्देमालासह आरोपींना पारडी पोलिसांच्या ताब्यात दिले.

## सुनेत्रा वहिनी जाधव कुटुंबियांच्या भेटीला



जाधव कुटुंबियांचे सांत्वन करतांना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

वृत्तसंस्था
सातारा, दि. २

नियतीचे खेळ खरोखरच अजब असतात. एकीकडे अजितदादांच्या अकाली जाण्याने महाराष्ट्र सुन्न झालेला असताना, त्यांच्याच सुरक्षेसाठी अहोरात्र पहारा देणारा एक निष्ठावान जवानही काळाच्या पडद्याआड गेला. साताऱ्याच्या फलटण तालुक्यातील तरडगावचं घर पोरकं झालं. अशा अत्यंत कठीण प्रसंगात, राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा वहिनींनी स्वतःचं वैयक्तिक दुःख सावरलं आणि थेट या जवानाच्या कुटुंबियांची भेट घेतली. पण त्या भेटीत नक्की काय घडलं की उपस्थितांचे डोळे पाणावले?

**सावली' गेली, पण 'आधार' उरला!**

अजितदादांचे अत्यंत विश्वासू सुरक्षारक्षक विदीप जाधव यांचा बारामतीमधील विमान अपघातात दुर्दैवी अंत झाला. दादांच्या सुरक्षेत सावलीसारखा सोबत राहणारा हा जवान अखेर निधनानंतर आपल्या कुटुंबाला पोरकं करून गेला. सुनेत्रा वहिनींना ही बातमी समजताच, त्यांनी आपल्या राजकीय व्यस्ततेतून वेळ काढला आणि थेट तरडगाव गाठलं. ज्या पतीच्या जाण्याचं दुःख स्वतः सुनेत्रा वहिनी सोसत आहेत, त्याच पतीच्या सुरक्षेत असणाऱ्या जवानाच्या घरी त्या सांत्वनासाठी पोहोचल्या.

**'अडचणीत मी सोबत आहे!' : सुनेत्रा वहिनींची साद**

जाधव कुटुंबियांच्या निवासस्थानी पोहोचल्यावर सुनेत्रा वहिनींनी विदीप जाधव यांच्या पत्नी आणि मुलांची भेट घेतली. त्यांचे अश्रू पुसत सुनेत्रा वहिनींनी दिलेला शब्द हा केवळ राजकीय शब्द नव्हता, तर तो एका माउलीचा मायेचा पाझर होता. मुलांच्या डोक्यावरून हात फिरवत सुनेत्रा वहिनी म्हणाल्या: ?'तुमच्या कोणत्याही अडचणीत मी स्वतः तुमच्या सोबत आहे, स्वतःला कधीही एकटं समजू नका.'

एका स्त्रीच्या संवेदनशीलतेचा हा सर्वोच्च क्षण होता. ज्या कुटुंबाचा कर्ता पुरुष गेला, त्यांच्यासाठी सुनेत्रा वहिनींनी दिलेला हा शब्द एखाद्या भक्कम आधारासारखा ठरला.

## राष्ट्रवादी आता पारेख, गोयल, शाहच्या खिशात : संजय राऊत

वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. २



दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना जे ओळखतात ते सागतील की. त्यांनी कधीही भाजपच्या अजेंड्यावर काम केले नाही. आपल्यावरच्या फाईल क्लिअर करून त्यांनी पुन्हा मूळ प्रवाहात यायची धडपड सुरू केली होती असा दावा खासदार संजय राऊत यांनी प्रसारमाध्यमांसमोर केला.

सुनेत्रा पवार यांनी दुःख विसरून शपथ घेतली आहे. आता त्यांना कर्तव्यासाठी बाहेर पडावे लागले असेही ते म्हणाले.

**अमोल मिटकरी यांचे प्रश्न**

अजित पवार यांचा मृत्यू रहस्यमय आहे. अमोल मिटकरी यांनी विधान अपघाताबाबत उपस्थित केलेले प्रश्न गंभीर आहेत. माझ्या मनात पहिल्या दिवशी शंका आली होती. अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत शरद पवारांनी पहिल्याच दिवशी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. मात्र, त्यांनाही हळूहळू समजेल अशा शब्दात खासदार संजय राऊत यांनी आपले मत मांडले. अजित पवार यांचा पक्ष आता पवार, पाटील यांचा पक्ष राहिला नाही. तो गोयल, पटेल. मोदी, शाह यांचा पक्ष होत आहे. मूळ पक्ष शरद पवार यांचा आहे. परंतु, अमित शाह यांनी तो अजित पवार यांच्या हाती दिला.

महाराष्ट्रातील प्रादेशिक अस्मिता जपणारा पक्ष भाजपने गिळून टाकला आहे. असा आरोपही संजय राऊत यांनी केला.

**महाराष्ट्राच्या हाती भोपळा**

केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्राच्या हातात भोपळा पडला आहे. जो महाराष्ट्र देशाच्या तिरीत जास्त भरणा करतो त्याला थातूरमातूर गोष्टी मिळाल्या आहेत. महाराष्ट्राला लुटायच आणि त्यालाच द्यायच. बुलेट ट्रेन या गोष्टीचा आम्हाला काहीच उपयोग नाही. हे सर्व गुजरातसाठी होत आहे. शेतकरी, कष्टकरी यांना काय मिळाले असा प्रश्नही राऊत यांनी उपस्थित केला.

आम्ही तमिळ जनतेच्या विरोधात कधीच भूमिका घेतली नाही. मात्र,ही कसली दादागिरी सुरू आहे. काढा मोर्चा. की कसली मुजोरी. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना हे वागणं मान्य आहे का? असा प्रश्न उपस्थित केला. मोर्चा काढणाऱ्या नेत्याला भाजपने तातडीने पक्षातून काढले पाहिजे असेही ते म्हणाले. मुंबईच्या अस्मितेसाठी आम्ही गिरगांवकर संघटनेने पुकारलेल्या मोर्चात मी सहभागी होणार होतो. गिरगावकरांच्या भावनांशी मी सहमत आहे. पण सध्या काही महत्वाच्या कामासाठी दिल्लीत असल्याने मला तेथे जाता येत नाही असेही ते म्हणाले.

## राष्ट्रवादी एकत्र येऊ नये म्हणून रचलेला कट : वडेट्टीवार



युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
मुंबई, दि. २

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताने महाराष्ट्र सुन्न झाला असतानाच, आता या घटनेमागे काही 'अदृश्य शक्तींचा' हात होता का? असे गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. त्यातच अजितदादांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा वहिनींनी ज्या घाईने उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली, त्यावरून विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी थेट 'कट-कारस्थाना'चा वास येत असल्याचा खळबळजनक दावा केला आहे. पण खरोखरच दोन पक्ष एकत्र येऊ नयेत म्हणून हा डाव शिजला का?

**विमान अपघाताची सावली अन् संशयाची सुई**

अजित पवार मुंबईहून बारामतीला निघाले असताना त्यांच्या विमानाचा भीषण अपघात झाला. सुरुवातीला दादा जखमी असल्याच्या बातम्या आल्या आणि अचानक त्यांच्या निधनाची अधिकृत घोषणा झाली. या घटनेनंतर राज्यभरातून हळहळ व्यक्त होत असतानाच, दुसरीकडे या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी आता सीआयडी (उखऊ) पथक तैनात करण्यात आले आहे. मात्र, चौकशी पूर्ण होण्याआधीच राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या जात आहेत.

**'शपथविधीची घाई का? भाजपचा दबाव होता?'**

विजय वडेट्टीवार यांनी सुनेत्रा वहिनींच्या शपथविधीवर अत्यंत टोकदार भाषेत टीका केली आहे. वडेट्टीवार म्हणाले की, 'अजितदादांच्या निधनानंतर दहावा-तेरावा होण्यापूर्वीच सुनेत्रा वहिनींनी शपथ घेतली, हे आपल्या हिंदू संस्कृतीला धरून नाही. जनतेच्या मनात प्रश्न आहे की, एवढी घाई का केली गेली? कदाचित भाजपच्या दबावामुळेच हा निर्णय झाला असावा.' दोन राष्ट्रवादी पक्ष पुन्हा एकत्र येऊ नयेत, यासाठीच हा सर्व कट रचला गेला असावा, अशी शंका त्यांनी व्यक्त केली आहे.

**भाजपच्या प्रवक्त्यांना चोख प्रत्युत्तर!**

भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांनी इंदिरा गांधींच्या मृत्यूनंतर राजीव गांधींनी घेतलेल्या शपथेचा दाखला दिला होता. त्यावर वडेट्टीवार यांनी जोरदार हल्ला चढवला. 'पंतप्रधान पद हे घटनात्मक पद असून ते एकही दिवस रिकामं ठेवता येत नाही. पण 'उपमुख्यमंत्रिपद' हे काही तसं घटनात्मक पद नाही. मग तेरावा होईपर्यंत थांबायला काय हरकत होती?' असा सवाल त्यांनी उपस्थित केला. भाजपला केवळ आपली सत्ता आणि वाटाघाटी टिकवून ठेवायच्या होत्या, असा आरोपही त्यांनी यावेळी केला.

**राजकारण 'सडक' झालंय!**

अजितदादांच्या मृत्यूवरून आणि विलीनीकरणाच्या चर्चेवरून सुरू असलेल्या या रणधुमाळीत शशिकांत शिंदे यांनीही संताप व्यक्त केला आहे. 'महाराष्ट्राचं राजकारण आता अत्यंत घाणेरडं आणि सडकलेलं झालं आहे,' अशा शब्दांत त्यांनी आपली नाराजी व्यक्त केली.

शरद पवारांनीही सुनेत्रा वहिनींच्या शपथविधीबद्दल आपल्याला काहीच कल्पना नसल्याचं सांगून या वादात अधिकच भर घातली आहे.

## मुंबई महापालिकेत उपमुख्यमंत्र्यांची मोठी 'फिल्डिंग'

### राष्ट्रवादीचे ४ गडी तंबूत ओढले

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
मुंबई, दि. २

मुंबई महानगरपालिकेच्या निकालाचा धुराळा शांत झाला, पण सत्तेचा पेच काही सुटेना. कोण बसणार मुंबईच्या गादीवर? हा प्रश्न मुंबईकरांना पडला असतानाच, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पडद्यामागून अशा काही हालचाली केल्या की अख्खं राजकीय गणितच उलटं-पालटं झालं आहे. राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांना खिंडार पाडत शिंदेंनी महायुतीचा आकडा थेट १२२ वर नेऊन ठेवला आहे. पण या 'ऑपरेशन मुंबई'मुळे महापालिकेत नेमकं काय शिजतंय?

**राष्ट्रवादीला 'दे धक्का' अनब शिंदेंची मास्टर खेळी!**



मुंबईच्या राजकारणात सध्या एकच चर्चा आहे, ती म्हणजे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी राष्ट्रवादीच्या दोन्ही तंबूत लावलेला सुरुंग! उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटातील ३ नवनिर्वाचित नगरसेवक आणि चक्क शरद पवार यांच्या गोटातील १ नगरसेवक अशा चौघांनीही 'घड्याळ' बाजूला ठेवून शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. विशेष म्हणजे, हे नगरसेवक आता शिंदे सेनेच्या अधिकृत गटात विलीन होणार आहेत. या एका धक्क्याने महाविकास आघाडीच्या गोटात मोठी खळबळ उडाली आहे.

या राजकीय भूकंपामुळे महापालिकेत सत्तेचं पारडं आता महायुतीच्या बाजूने पूर्णपणे झुकलं आहे. पालिकेतील नव्या समीकरणांवर नजर टाकली तर काय दिसतं? शिंदे सेनेची ताकद वाढली.

## मुंबईत पाणी माहगणार

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी
मुंबई, दि. २

'निवडणूक आली की सवलतींचा पाऊस आणि निवडणूक गेली की दरवाढीचा घाव,' हे राजकारणातलं जुनं समीकरण मुंबईकरांच्या बाबतीत पुन्हा एकदा खरं ठरलं आहे. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकांचे निकाल लागून आठवडा उलटत नाही, तोच महापालिका प्रशासनाने मुंबईकरांच्या नळाला 'दरवाढीचा पीळ' देण्याची तयारी पूर्ण केली आहे. गेल्या दोन वर्षांपासून बासनात गुंडाळून ठेवलेला पाणीपट्टी वाढीचा प्रस्ताव आता तातडीने मंजूर करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने दरवाढीचा जो मसुदा तयार केला आहे, तो पाहून सामान्य मुंबईकरांच्या डोळ्यात पाणी येण्याची शक्यता आहे.

साधारणपणे ६ ते ७ टक्के दरवाढ सुचवण्यात आली आहे. कधीपासून लागू होणार. नव्या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीलाच, म्हणजेच १ एप्रिल २०२६ पासून मुंबईकरांच्या खिशाला ही कात्री लागण्याची शक्यता आहे. हा प्रस्ताव आता अंतिम मंजुरीसाठी आयुक्तांकडे पाठवण्यात येणार असून, निवडणुकांचे ओझे खांद्यावरून उतरल्यामुळे प्रशासन आता कोणताही विलंब न लावता यावर शिक्कामोर्तब करण्याच्या तयारीत आहे.

दैनिक **युवाराष्ट्र दर्शन**

# यवतमाळ

मंगळवार, ३ फेब्रुवारी २०२६ — जिल्हा





### ढाणकीत संत शिरोमणी रोहिदास महाराज जयंती साजरी

ढाणकी : प्रभाग क्रमांक दोनमध्ये संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून नगरसेवक नागेश रातोळे व सौ.सारिका विनोद कांबळे उपस्थित होत्या. सामाजिक कार्यकर्ते शुभम बाबुळकर तसेच येथील वॉर्डातील सर्व नागरिकांनी उपस्थित राहुन जयंती साजरी केली. (युवाराष्ट्र दर्शन छायाचित्रसेवा)

**युवाराष्ट्र दर्शन**

-: कार्यालयीन पत्ता :-
गुरुमाऊली सोसायटी, दाते कॉलेज रोड, जुना उमरसरा, यवतमाळ ४४५००१

-: जिल्हा प्रतिनिधी :-
संजय सावरकर मो. ९४२१८४४८७०
* एजन्सीसाठी संपर्क
ई-मेल ssawarkar43@gmail.com

## संक्षिप्त

### डब्यात ठेवलेले दहा हजार रुपये उडवले

•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ : गरजेला वापरता येतील म्हणून घरातील डब्यात सुरक्षित ठेवलेले दहा हजार रुपये अज्ञात चोरट्याने लंपास केले. ही घटना राळेगाव तालुक्यातील आष्टोना गावात २९ जानेवारी रोजी उघडकीस आली. याप्रकरणी मधुकर विठ्ठल आत्राम (४८) रा. आष्टोना ता. राळेगाव यांनी वडकी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. घटनेच्या दिवशी चोरट्याने त्यांच्या घराचा कुलूप कोंडा तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर कपाटातील स्टीलच्या डब्यात ठेवलेले नगदी १० हजार रुपये चोरुन नेले, असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. प्राप्त फिर्यादीवरुन वडकी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## बेशिस्त वाहनचालकांवर पोलिसांची कारवाई

### सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल गुंडे 'ॲक्शन मोड'वर! नियमबाह्य पार्किंगला चाप

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, ढाणकी, दि.२ फेब्रुवारी —**

शहरातील मुख्य रस्त्यांवर वाढलेला बेशिस्त वाहतुकीचा हैदोस, 'नो पार्किंग'चा विळखा आणि नियम धाब्यावर बसवून चालविल्या जाणाऱ्या वाहनांमुळे वाढणारे अपघात लक्षात घेता, वाहतूक शाखेने ढाणकी शहरात धडक मोहीम सुरू केली आहे. वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल गुंडे स्वतः रस्त्यावर उतरून 'ॲक्शन मोड'मध्ये आल्याने नियम तोडणाऱ्या वाहनधारकांचे धाबे दणाणले आहेत.




काही दिवसांपूर्वीच ढाणकी शहरात एका तीन चाकी पॅसेंजर ऑटोच्या धडकेत एक स्थानिक व्यापारी गंभीर जखमी झाला होता. या घटनेमुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत होता. अनेक ऑटो आणि ट्रॅक्टर चालक आपल्या वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त आवाजात टेप रेकॉर्डर लावून गाणी वाजवतात. या कर्णकर्कश आवाजामुळे चालकाला मागील बाजूने येणाऱ्या वाहनांचा हॉर्न किंवा पादचाऱ्यांचा आवाज ऐकू येत नाही, जे भीषण अपघातांचे मुख्य कारण ठरत आहे. प्रवाशांनी आणि नागरिकांनी अशा 'म्युझिक सिस्टीम'वर कारवाईची मागणी केली होती, ज्याची दखल आता पोलीस प्रशासनाने घेतली आहे. वाहतूक शाखा सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल गुंडे यांच्या मार्गदर्शनात पोलीस पथकाने शहरात ध्वनिक्षेपकाद्वारे (भोंगा) फिरून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना कडक इशारा दिला आहे. ज्या चालकांकडे चालक परवाना (लायसन) नाही, वाहनांची वैध कागदपत्रे नाहीत किंवा जे चालक मुख्य बाजारपेठेत 'नो पार्किंग'मध्ये वाहने उभी करून वाहतुकीला अडथळा निर्माण करतात, अशांवर जागेवरच दंडात्मक कारवाई करण्यात आली.

**बेशिस्त वाहनाला लगाम घालण्यासाठी पोलिसांनी सुरू केलेल्या या मोहिमेचे ढाणकीतील व्यापारी संघटना आणि सुज्ञ नागरिकांकडून मोठे कौतुक होत आहे. "अशा कडक कारवाईमुळे भविष्यातील गंभीर अपघात टळतील आणि वाहतूक व्यवस्था सुरळीत होईल," अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. ही मोहीम केवळ तात्पुरती न राहता सातत्याने सुरू राहावी, अशी आग्रही मागणी आता ढाणकीकरांकडून केली जात आहे.**

या मोहिमेमुळे रस्त्याच्या मधोमध वाहने उभी करणाऱ्यांनाही जरब बसली आहे.

## श्रीमद् राजचंद्र प्रभूंच्या १२५ व्या निर्वाण वर्षानिमित्त पाच दिवसीय पंचांन्हिका महोत्सव

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. २ फेब्रुवारी**

परम कृपाळू देव श्रीमद् राजचंद्र प्रभू यांच्या १२५ व्या निर्वाण वर्षानिमित्त श्रीमद् राजचंद्र ज्ञान मंदिर, राजेंद्र नगर, यवतमाळ येथे दिनांक ३ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पाच दिवसीय पंचांन्हिका महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. भक्ती, सत्संग, पूजा, आरती व आध्यात्मिक चिंतनाने परिपूर्ण असलेला हा महोत्सव भाविकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. दिनांक ३ फेब्रुवारीपासून दररोज सकाळी ५ ते ७.१५ भक्ती, सकाळी ९.३० ते १०.४५ सत्संग, सकाळी १०.४५ ते दुपारी १२ वाजेपर्यंत पूजा, भक्ती, आरती व दिवा, दुपारी २.३० ते ३.३० भक्ती, दुपारी ३.४० ते ४.४५ सत्संग, सायंकाळी ६.३० ते ८ देववंदन व सायंकाळची भक्ती तसेच रात्री ८ ते ९ सत्संगाचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ रोजी शनिवार सकाळी ९ ते ११ या वेळेत भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ही शोभायात्रा सकाळी ९ वाजता श्रीमद् राजचंद्र ज्ञान मंदिर, राजेंद्र नगर येथून प्रारंभ होऊन स्टेट बँक चौक, पोस्ट ऑफिस मार्गे परत श्रीमद् राजचंद्र ज्ञान मंदिर येथे विसर्जित होणार आहे. या पाच दिवसीय पंचांन्हिका महोत्सव व शोभायात्रेत यवतमाळ शहरासह परिसरातील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन श्रीमद् राजचंद्र ज्ञान मंदिर, राजेंद्र नगर, यवतमाळ येथील ट्रस्टी व आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



## प्रगती नगर ओपनस्पेसमध्ये वॉलकंपाउंड व जॉगिंग ट्रॅकसाठी रिता पहापळे यांचे निवेदन

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, वणी, दि. २ फेब्रुवारी**

वणी नगर परिषद अंतर्गत प्रभाग क्रमांक २ मधील प्रगती नगर परिसरातील ओपनस्पेसमध्ये वॉलकंपाउंड व जॉगिंग ट्रॅक उभारण्याची मागणी नगरसेविका तथा महिला व बालकल्याण समितीच्या सभापती रिता महेश पहापळे यांनी नगर परिषद अध्यक्षांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



प्रगती नगर येथील पाण्याच्या टाकीजवळ असलेल्या ग्राउंडला संरक्षक भिंत (वॉलकंपाउंड) नसल्याने तेथे अस्वच्छता, वाढलेली झाडे-झुडपे व काटेरी बाभूळ यामुळे नागरिकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही बाब सार्वजनिक आरोग्य व स्वच्छतेच्या दृष्टीने गंभीर असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सदर ग्राउंडची साफसफाई करून संरक्षक भिंत बांधावी तसेच नागरिकांसाठी जॉगिंग ट्रॅक तयार करावा, जेणेकरून लहान मुले, युवक व ज्येष्ठ नागरिकांना व्यायाम व खेळासाठी सुरक्षित जागा उपलब्ध होईल, अशी मागणी करण्यात आली आहे. यासोबतच वयोवृद्ध नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था करावी तसेच ग्राउंडच्या सभोवती वृक्षलागवड करण्यात यावी, अशीही सूचना करण्यात आली आहे. या समस्या नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी व आरोग्याशी निगडित असल्याने नगर परिषद प्रशासनाने याची तातडीने दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षा रिता पहापळे यांनी व्यक्त केली आहे.

## आर्णीच्या युवकाने साकारली बाबा कंबलपोष दर्ग्याची हुबेहूब कलाकृती



**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, आर्णी, दि. २ फेब्रुवारी**

सर्वधर्मसमभावाचे प्रतीक असलेल्या बाबा कंबलपोष दर्गा शरीफची हुबेहूब कलाकारी कोरीव कामातून साकारण्यात आली आहे. आर्णी शहरातील युवक सुवर्णकार शेख आबीद यांनी आपल्या कलागुणांच्या जोरावर ही अत्यंत आकर्षक व भाविकतेने परिपूर्ण अशी कलाकृती तयार केली आहे. बाबा कंबलपोष उर्स शरीफच्या पावन निमित्ताने येत्या ५ तारखेला ही कलाकृती बाबा कंबलपोष दर्गा शरीफला भेट देण्यात येणार आहे. दर्ग्याचा फोटो अत्यंत बारकाईने, श्रद्धा आणि कौशल्य यांच्या संगमातून कोरून साकारण्यात आल्याने पाहणाऱ्यांचे लक्ष वेधून घेत आहे. या अनोख्या कलाकृतीचे दर्शन घेतल्यानंतर सर्व स्तरांतून शेख आबीद यांच्या कलागुणांचे आणि त्यांच्या समाजभावनेचे कौतुक होत आहे. आर्णी शहरातील युवकाने केलेली ही कलासाधना धार्मिक सलोखा आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश देणारी ठरत आहे.

## दिग्रस येथे सार्वजनिक शिवजयंतीची आढावा बैठक संपन्न

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, दिग्रस, दि. २ फेब्रुवारी**

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सार्वजनिक शिवजयंती उत्सव साजरा करण्याकरिता राष्ट्रमाता जिजाऊ भवन येथे दिग्रस शहरातील विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी तसेच शहरातील आजी-माजी नगराध्यक्ष नगरसेवक उपनगराध्यक्ष तसेच विविध पदाधिकारी यांच्या उपस्थितीत नुकतीच आढावा बैठक घेण्यात आली दरवर्षीप्रमाणे याही वर्षी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्याचे ठरविले असून या तीन सार्वजनिक शिवजयंती उत्सवा दरम्यान 17 फेब्रुवारीला अशोक वानखेडे दिल्ली येथील प्रख्यात पत्रकार यांचे व्याख्यान असून 18 फेब्रुवारी जिजाऊ ब्रिगेड यांच्या विविध स्पर्धेचे आयोजन तसेच 19 फेब्रुवारी सकाळी मोटरसायकल रॅली तसेच अभिवादन रॅली शोभायात्रा ढोल पथक लेझीम पथक देखावे चित्ररथ हरिपाठ मंडळ इतिहासाचा जागर झाक्या व देखावे इत्यादी विषयावर चर्चा याप्रसंगी करून हे कार्यक्रमाची रूपरेषा ठरवण्यात आली यावेळी मराठा सेवा संघाचे अध्यक्ष दुर्गादास गायकवाड, विजयकुमार बंग,सुधीर देशमुख,सचिन बनगिनवार,उपनगराध्यक्ष रवींद्र अरगडे, गोडवे,राम नरळे, दीपक वानखडे, प्रेम राठोड, बीटी कनाके,अशोक तायडे, गिरीश देशमुख,दिनेश चौधरी, सुरेश जळ,सुनील राऊत, मजर अहमद खान,सुनील लबडे, लक्ष्मण टेकाळे,सतीश महाले, सौरव शिखरे,युवी सोळंके,टिळक नाईक, गणेश भेंडे, दिलीप जवादे,गजानन गंडाळे,रामेश्वर पेंदोर,प्रदीप चोपडे, गिरीश साबळे,विजय सरदार, सुदर्शन हजबे, रविशंकर ढोले,राजेंद्र ठाकरे, भीमराव खारोडे उपस्थित होते.



## आशीर्वाद स्वीट मार्ट सील करण्याचे अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांचे आश्वासन

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि.२ फेब्रुवारी —**

यवतमाळ शहरातील स्टेट बँक चौक परिसरात असलेल्या आशीर्वाद स्वीट मार्ट येथून विक्री करण्यात आलेल्या ढोकळ्यामध्ये जिवंत अळ्या आढळून आल्याच्या गंभीर घटनेने संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे.नागरिकांच्या आरोग्याशी थेट खेळ करणाऱ्या या प्रकाराविरोधात ठोस व कठोर कारवाईची मागणी होत असून,आज दिनांक २ फेब्रुवारी (सोमवार) रोजी संबंधित प्रकरणाबाबत पुन्हा एकदा अन्न व औषध प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात आला.



या प्रकरणी सोशल मीडिया काँग्रेस कमिटी यवतमाळ जिल्हाध्यक्ष कृष्णा पुसनाके,कॉम्रेड सचिन मनवर,महिला पोलीस हवालदार मंजुळा किशोर भगत व शेतकरी चळवळीचे कार्यकर्ते प्रा. पंढरी पाठे यांनी सहायक आयुक्त (अन्न) / अन्न सुरक्षा अधिकारी महाजन यांची प्रत्यक्ष भेट घेतली. यावेळी यवतमाळ शहरासह संपूर्ण यवतमाळ जिल्ह्यातील हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, स्वीट मार्ट, तसेच अन्न व दुधजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्या आस्थापनांची अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ नुसार सखोल तपासणी व चौकशी करण्यात यावी,अशी ठाम मागणी उपस्थितांनी केली. दिनांक २६ जानेवारी रोजी आशीर्वाद स्वीट मार्ट येथून खरेदी करण्यात आलेल्या ढोकळ्यामध्ये अळ्या आढळून आल्या होत्या.हे ढोकळे ड्युटी संपल्यानंतर महिला पोलीस हवालदार मंजुळा किशोर भगत यांनी घरी नेले होते.लहान बहिणीच्या वाढदिवसानिमित्त मुलांनी ढोकळ्याचे सेवन केले असतांना, वाढदिवसाच्या मुलीच्या लक्षात प्रत्यक्ष अळी आल्याने हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. या घटनेमुळे लहान मुलांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला असून, कुटुंबीयांसह नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

या संदर्भात अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांकडे यापूर्वीच अधिकृत निवेदन सादर करण्यात आले असून, संबंधित दुकानाची तात्काळ तपासणी, अन्ननमुने जप्त करून प्रयोगशाळा तपासणी,दोषी आढळल्यास दुकान सील करणे अथवा परवाना रद्द करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. आजच्या भेटीत अन्न सुरक्षा अधिकारी महाजन यांनी आशीर्वाद स्वीट मार्ट,स्टेट बँक चौक,यवतमाळ हे दुकान लवकरात लवकर सील करण्यात येईल,असे ठोस आश्वासन दिले.

तसेच भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी जिल्हाभर विशेष तपास मोहीम राबविण्यात येईल,असेही त्यांनी स्पष्ट केले.यावेळी अन्न सुरक्षा विभागाचे कार्यालयीन कर्मचारीही उपस्थित होते. या घटनेमुळे यवतमाळ शहरासह संपूर्ण जिल्ह्यातील अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाला असून,आता अन्न व औषध प्रशासन कोणती कठोर व उदाहरणार्थ कारवाई करते,याकडे सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## विशाल हिंदू संमेलनाचे आयोजन

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. २ फेब्रुवारी**

हिंदू बांधवात एकता अखंडता व समरसते ची भावना जागवण्यासाठी व हिंदू समाज व हिंदू राष्ट्र सक्षम करण्यासाठी तसेंच नवचैतन्यासाठी सकल हिंदू समाजाच्या वतीने शनिवार दिनांक १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी 5 वाजता हनुमान मंदिर पुष्पकुंज सोसायटी,वडगाव रोड,यवतमाळ येथे विशाल हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

रविवार दिनांक १ फेब्रुवारी रोजी पुष्पकुंज सोसायटी,यवतमाळ येथे भूमिपूजन सोहळा संपन्न झाला, सर्व कार्यक्रम व उपक्रम पर्यावरण पूरक व्हावे यांचा संकल्प म्हणून १०० वर्ष जुने वडाच्या झाडाच्या पूजन अध्यक्षांच्या व मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले,तसेंच ७ फेब्रुवारी रोजी सर्व उपवस्तीमध्ये दुचाकी रॅलीचे आयोजन हॉलिबाल ग्रुपतर्फे करण्यात आले आहे व दिनांक 12 व 13 फेब्रुवारी रोजी महीलांसाठी विविध स्पर्धांचे सुद्धा आयोजन करण्यात आलेले आहे ,

याप्रसंगी हिंदुत्वाचा उद्घोष यशस्वी व्हावा हिंदू समाज पर्यायाने भारत देश बलवान व्हावा म्हणून आशीर्वचनासाठी प.पु संत महंत अंबिका माऊली ॐ नवशक्ती अंबिका भक्ती धाम, बोपापूर तसेंच प्रमुख वक्ते नागपूर येथील अमोल पुसदकर, उत्तम लेखक, प्रख्यात वक्ते व सामाजिक कार्यकर्ते, आजच्या परिस्थितीवर मार्गदर्शन करणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात सायंकाळी ५ वाजता भजनसंध्या ने होईल,हिंदू संमेलनाच्या समारोपानंतर भव्य महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकातर्फे करण्यात आलेले आहे.

### निवडणूक रॅलीत कार्यकर्त्याचा अपघात

यवतमाळ : नगरपालिकेची निवडणूक रॅली सुरु असतांना एक कार्यकर्त्याला भारधाव कारने धडक दिली. यात त्या कार्यकर्त्याचा पाय जायबंदी झाला आहे. २१ डिसेंबर २०२५ रोजी घडलेल्या अपघाताची तक्रार १ फेब्रुवारी २०२६ रोजी शहर पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली. जमील बाबूलाल शेख (५७) रा. वंजारी फैल यवतमाळ असे या अपघातात जखमी झालेल्या कार्यकर्त्याचे नाव आहे.

### नावात बदल

माझे जुन्या पासपोर्ट वर नाव : HARSHAD KANHUBHAI PATEL हे होते व जुना पासपोर्ट नंबर N 7429380 हा आहे. आता त्यात बदल करुन माझे नविन नाव HARSHADBHAI KANUBHAI PATEL हे आहे. या दोन्ही नावाची व्यक्ती एकच असुन या पुढील व्यवहारात मला माझ्या नविन नावानेच ओळखावे.

**HARSHADBHAI KANUBHAI PATEL**
**Address : S/o Kanubhai Patel Dhoraji Nagar Ward No. 10 Ner Dist-Yavatmal Maharashtra 445102**

### नगर परिषद कार्यालय, नेर नबाबपूर जि. यवतमाळ
### निवीदा सुचना (अल्प)

नेर नबाबपुर नगर परिषद कार्यालय सर्व साधारण निधी अंतर्गत खालील कामाकरीता ईच्छूक पुरवठादार, सेवासंस्था, महीला बचत गट व इतर पुरवठादार यांचे कडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. कामासंबंधाने अटि व शर्ती नगर परिषदेच्या संबंधीत विभागात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील..

| | |
|---|---|
| कोरे निवीदा प्रपत्र करीता अर्ज व शुल्क स्विकारणे | दि. 06/02/2026 ते 14/02/2026 पर्यंत |
| सिलबंद निविदा स्विकारणे | दि. 14/02/2026 पर्यंत |

| अ. क्र. | साहीत्याचे /कामाचे नाव | अंदाजीत किमंत रू. | कोरे निवीदा प्रपत्र किंमत | निवीदा अनामत रूपये | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | जागतीक महीला दिन उत्सव 2026 करीता सर्व सुविधा सभागृह व साउंड. बैठक, प्रसिध्दिपत्रके, निमंत्रण पत्रीका, व इतर सुविधा पुरविने | रु. 450000/- | रु.500/- | रु.1000/- | कामाच्या आदेशानुसार |

**अटि व शर्ती :-**

1) देयकामधुन नियमाप्रमाणे सर्व शासकिय कपाती करण्यात येतील.
2) कोणतीही अट असलेली निवीदा मंजुर केल्या जाणार नाही. निवीदा अनामत रक्कमेत कोणत्याही परीस्थीतीत सुट मिळणार नाही.
3) कोणतेही कारण न दर्शविता एक किंवा सर्व निवीदा नाकारण्याचा अधिकार नगर परिषदेने राखुन ठेवला आहे.
4) कोरे निवीदा प्रपत्र नगदीने व अनामत रक्कम नगदीने दिनांक 06/02/2026 ते 14/02/2026 पर्यंत कार्यालयीन वेळात भरणा करता येईल
5) मंजुर पुरवठादार यांना रू.500/-च्या स्टॅप पेपर वर कामाचा करारनामा करून दयावा लागेल.

**सौ. सुनिता प. जयस्वाल** अध्यक्ष — **सौ. शिवानी नि. गुगलिया** उपाध्यक्ष — **सौ. त्रिवेनी रु. दुधे** सभापती म. व बा.क्र. — **श्री. विठ्ठल केदारे** मुख्याधिकारी

## स्वयंदीप कॉलेज ऑफ नॅचरोपथी अँड योगिक सायन्स रिसर्च सेंटरचे थाटात उद्घाटन

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. २ फेब्रुवारी**

यवतमाळ जिल्ह्यातील तरुणांचे भविष्य घडवणारी ऐतिहासिक घडामोड घडली असून स्वयंदीप कॉलेज ऑफ नॅचरोपथी अँड योगिक सायन्स रिसर्च सेंटरचे उद्घाटन मोठ्या उत्साहात आणि थाटात पार पडले. आजपर्यंत आरोग्य शिक्षणासाठी जिल्ह्याबाहेर जावे लागणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही संस्था म्हणजे नवी दिशा आणि नवा आशेचा किरण ठरत आहे. ही संस्था यवतमाळ जिल्ह्यातील नैसर्गिक उपचार पद्धतीवर आधारित एकमेव शैक्षणिक केंद्र असून, येथे निसर्गोपचार व योगिक विज्ञानाच्या माध्यमातून आजारांवर उपचार तसेच दर्जेदार वैद्यकीय शिक्षण दिले जाते. वाढत्या जीवनशैलीजन्य आजारांच्या पार्श्वभूमीवर नॅचरोपथी उपचार पद्धतीकडे देशभरातून मोठ्या प्रमाणात पाहिले जात आहे. विशेष म्हणजे आयुष मंत्रालयाच्या अंतर्गत नॅचरोपथी डॉक्टरांची अधिकृत नोंदणी होत असून, या क्षेत्रात शिक्षण घेतलेल्या डॉक्टरांना देशातच नव्हे तर परदेशातही मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध आहेत. भविष्यात या क्षेत्रात कुशल डॉक्टरांची तीव्र कमतरता भासणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. अशा पार्श्वभूमीवर नॅचरोपथी डॉक्टर घडवणारी दर्जेदार शैक्षणिक संस्था यवतमाळमध्ये सुरू होणे ही केवळ शैक्षणिक नव्हे तर जिल्ह्याच्या आरोग्य व्यवस्थेसाठी क्रांतिकारी पायरी मानली जात आहे. यवतमाळ जिल्ह्यातील तरुण-तरुणींनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन नॅचरोपथी शिक्षण स्वीकारावे व स्वतःचे उज्ज्वल करिअर घडवावे, असे ठाम आवाहन संस्थेचे संचालक डॉ. दीपक घरझोडे आणि प्राचार्य डॉ. कल्पना कुलरे यांनी केले. सध्या संस्थेची प्रवेश प्रक्रिया सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. या उद्घाटन समारंभाला श्रीमती अंजली घरझोडे, गौरव आगाशे, ऋषभ शिंदे, निवृत्त वनाधिकारी दिलीप कुलरे, विजयकुमार बुंदेला, अविनाश मसराम व राधिका मसराम, विजय खेनवार, सीमा खेनवार, प्रसाद चौधरी, रमेश शहाडे, शाहरुख पठाण, अमोल खुनकर व संतोषी खुनकर, महेश लंगडे, राधिका धामणकर, हेमलता चव्हाण, शुभम यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.



## डंकीन घाटातून रेतीची चोरी ; चौघांवर गुन्हा दाखल

**वर्धा, :** हिंगणघाट तालुक्यातील डंकीन रेती घाटातून रेतीची चोरी करणा-या चौघांवर गुन्हा दाखल करत १० लाख १४ हजारांचा मुददेमाल जप्त केला, ही कारवाई शनिवारी हिंगणघाट पोलिसांनी केली, उमेश हनुमंत मेश्राम (२४, मराठवाकडी, जि. यवतमाळ) ह. मु. भीमनगर, वॉर्ड, हिंगणघाट) हेमराज सय्यद रा. वीर भगतसिंग वॉर्ड, स्वप्नील लोखंडे रा. लोटन चौक (पसार) असे आरोपीचे नाव आहे, पोलिसांना माहिती मिळाली की, डंकीन रेती घाटातून दोन ट्रॅक्टर अवैधरित्या काळया वाळूची चोरी करत आहे, पोलिसांनी नाकाबंदी करुन एम. एच. ३२, ए. ९५९० व ट्रॉली क्रमांक एम. एच. ३२, ए. ५११६ व एमएएच. २९-२०९८ या वाहनांना थांबवून रॉयल्टीबाबत विचारपूस केली मात्र, त्यांच्याकडे कोणतेही कागदपत्र नव्हते, त्यांच्याकडे कोणतेही कागदपत्रे नव्हते, त्यानुसार ही कारवाई करत हिंगणघाट पोलिसांत तक्रार नोंद केली.

# स्टेशन चौक ते नाचणगाव रस्त्याचे काम त्वरीत पूर्ण करण्यात यावे

### ❐ अन्नत्याग आंदोलनाचा इशारा ❐ नागरिकांचे साबांविच्या अभियंत्याला निवेदन

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**पुलगाव, दि. ०२**

स्थानिक स्टेशन चौक ते नाचणगांव रस्त्याचे काम रखडले असुन यामुळे नागरिकांना अडचणीचा सामना करावा लागत आहे. रस्त्याच्या अर्धवट बांधकामामुळे नागरिकांना धुळीचा सामना करावा लागत असुन आरोग्याचा प्रश्न उपस्थित झाला आहे. पाण्याचा निचरा होत नसल्याने नाल्या तंडूंब भरल्या असुन यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे. रस्त्याचे काम अपूर्ण असल्याने शहरातील नागरिक आणि व्यापाऱ्यांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत आहे. रस्त्याचे कॉंक्रीटचे काम तसेच नागरिकांच्या विविध समस्या मार्गी न लागल्यास सर्व नगरसेवक आणि नागरिकांसह सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयासमोर अन्नत्याग उपोषण करण्याचा इशारा नगराध्यक्षा कविता ब्राम्हणकर योच्या नेतृत्वा साबांविच्या अभियंत्याला निवेदनातून दिला आहे.



सविस्तर असे की, स्टेशन चौक ते नाचणगांव रस्त्याचे काम रखडले असुन दिवसभर मोठ्या प्रमाणात धुळ उडत आहे. यामुळे स्थानिक व्यापारी आणि नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून, नागरिकांचा संताप वाढत आहे. सिमेंट कॉंक्रीटचे काम, स्टेशन चौकातील रस्त्याचे उर्वरित सिमेंट कॉंक्रीटीकरण काम तातडीने पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असलेल्या नाल्यांमधील पाण्याचा निचरा अद्याप करण्यात आलेला नाही. साचलेल्या पाण्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरून साथीचे रोग पसरण्याची दाट शक्यता आहे. ज्या ठिकाणी सिमेंट रोडवरील गिट्टी उखडली आहे, तिथे तांत्रिक निकषांनुसार तात्काळ दुसरा कोट टाकण्यात यावा. रस्त्याच्या डिव्हायडरमध्ये मोठे गोटे आणि मुरूम भरलेला आहे. झाडे जगण्यासाठी तो मुरूम काढून तिथे सुपीक माती टाकण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. निवेदन देतेवेळी नगराध्यक्ष कविता बाम्हणकर, कॉंग्रेस कमेटी अध्यक्ष सुनील बाम्हणकर, उपाध्यक्ष दिपक आहुजा, रवि केशरवानी, दिलिप वलीवकर मनोज श्रीवास, देवानंद येसनकार, नगरसेवक व कार्यकर्ते उपस्थित होते.

# भजन समाज जागृतीचे मोठे माध्यम - खासदार काळे

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ०२**

भजन मंडळांना केवळ बक्षीसापुरती ही स्पर्धा मर्यादीत न ठेवता प्रत्येक भजन करणाऱ्या मंडळीने आपल्या भजनाच्या माध्यमातून समाज सेवा व समाज जागृती कशी होईल हे ही लक्षात घेतले पाहीजे असे उदगार खासदार अमर काळे यांनी काढले.

कानगांव येथे आयोजित खंजिरी भजन स्पर्धेचे पाचवे वर्ष असून स्पर्धेला खासदार अमर काळे प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी १९४२ मध्ये जेव्हा गांधीजींनी चलेजाओ चा नारा दिला आणि त्यानंतर संपूर्ण देशामध्ये इंग्रजांच्या विरोधात एक मोठे आंदोलन पेटले त्यावेळी विदर्भामध्ये आष्टी आणि चिमूर हे विदर्भातील लढे ज्यांच्या प्रेरणेने लढले ती प्रेरणा राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या भजनातून आली होती. या भजनाच्या माध्यमातून आष्टीचा रणसंग्राम झाला त्यात वेगवेगळया जाती धर्माचे सहा जण शहीद झाले होते.



त्यामुळे भजनाच्या माध्यमातून काय होऊ शकते हे आपल्याला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी दाखवून दिले आहे व आज सुध्दा आपल्याला या भजन मंडळाच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून समाजातील वाईट प्रवृत्ती विरोधातील लढा लढायचा आहे. या भजनाच्या माध्यमातून आपल्याला समाज जागृतीचे आव्हानात्मक काम पूर्ण करावयाचे आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार, त्यांनी गायीलेली भजने, वेळोवेळी केलेली उदबोधने ही सगळी लहान मुलांच्या मनावर रुजवावी लागतील तरच आपण पुढच्या पिढीला काहीतरी चांगले देऊ शकू असेही त्यांनी सांगीतले. आयोजित केलेल्या सप्तखंजेरी जनक व सतपाल महाराजांचे शिष्य इंजि. उदयपाल महाराज वनीकर यांचे प्रवचनाचा आस्वाद घेतला. यावेळी हरीभाऊ ठाकरे, नामदेव कामडी, अनिल बुकणे, समीर शेख, गौरव ओंकार तसेच गावकरी मंडळी, महीला व पुरुष उपस्थित होते.

## मुलींनी दिला वडिलांना मुखाग्नी



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**पुलगाव, दि. ०२**

येथील बडे ले-आऊटमधील रहिवासी व गायक श्रीधर जानराव उगले (७५) यांचे रविवारी अल्पशा आजाराने निधन झाले, त्यांच्या पार्थिवाला चारही मुलींनी मुखाग्नी देत आदर्श घडविला.

उगले यांच्या मागे पत्नी, चारही मुली व आप्त परिवार आहे, चारही मुलींनी पित्याच्या तिरडीला खांदा देण्याचा निर्णय घेतला, एकीने आगट धरुन इतर तीन मुलींना खांदा दिला, मोक्षधामात मुलींनीच पित्याच्या पार्थिवाला मुखाग्नी दिला, श्रीधर उगले यांचा अंतिम इच्छा होती की, आपल्या अंतिम यात्रेला चार मुलींनी खांदा देऊन स्थानिक पंचधारा मोक्षधामात पोहोचवावे, त्यानुसार मुलींनी त्यांची अंतिम इच्छा पूर्ण केली.

## अभ्यासाचे कारण देत मुलगी गेली घरातून निघून

### ऑपरेशन मुस्कानमुळे दोन तासातच मुलगी आई-वडीलांच्या स्वाधीन

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. २**

देवळी पो.स्टे.हद्दीत येत असलेल्या सरुळ गावातील एक मुलगी रात्री अभ्यासाचे कारण देत रात्री दरम्यान घरातून निघून गेली. घरात व परिसरात बराच वेळ शोध घेवूनही मुलीचा शोध लागला नाही. अखेर मुलीच्या आई-वडीलांनी देवळी पो. स्टे. मध्ये तक्रार दिली. प्रभारी ठाणेदार संदिप कापडे घटनेचे गांभीर्य लक्षात घेत पीएसआय शिवराज जाधव यांना मुलीचा शोध घेण्यास रवाना केले. पोलिस पथकाने मिसिंग मुलीबाबत घटनास्थळावरुन व तांत्रिक बाबीचा व सीसीटिव्हीचा तपास करुन दोन तासाचे आत मुलीचा शोध



घेतला व मुलीला सुखरुप पो. स्टेशनला घेवून आले. मुलीला घरुन निघून कां गेली याबाबत विचारणा केली असता तिने अभ्यासाचे कारणाने घरुन निघून गेल्याचे सांगितले. त्याबाबत जिल्हा व बालकल्याण अधिका-यांशी चर्चा करून मुलीला तिच्या आई-वडीलांच्या स्वाधीन केले.

ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलिस अधिकारी वंदना कारखेले यांच्या मार्गदर्शनात प्रभारी ठाणेदार संदीप कापडे यांचे निर्देशाप्रमाणे पीएसआय शिवराज जाधव व पथकातील निमजे, पंकज चामचोर, प्रियंका तायवाडे, फिरोज पठाण आदींनी केली.

## संत नरहरी पुण्यतिथीनिमित्त सराफा बाजार ४ रोजी रहाणार बंद

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ०२**

संत नरहरी पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त सराफा व्यवसायिकांची दुकाने ४ फेब्रुवारी रोजी बंद राहतील. सोनार समाजाचे आराध्य दैवत श्री. संत नरहरी महाराज यांचा 'पुण्यतिथी सोहळा' दरवर्षीप्रमाणे सोनार समाजातर्फे साजरा केली जातो.

यावर्षी पुण्यतिथी सोहळयानिनिमित्त अनेक सामाजिक, धार्मिक कार्यक्रम आयोजित केले आहे. ४ फेब्रुवारी रोजी श्री. संत नरहरी महाराज यांचा पुण्यतिथी सोहळ्यामध्ये सर्व सराफ व्यावसायिक सन्मानित होणार आहे. याच अनुषंगाने ४ फेब्रुवारी रोजी संपूर्ण सराफा व्यावसायिकांची दुकाने बंद राहतील.

# अर्थमंत्री निर्मला सितारमण यांनी सादर केला अर्थसंकल्प

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ०२ प्रतिनिधी.**

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मोदी सरकारचा अर्थसंकल्प सादर केला. हा त्यांचा सलग नववा केंद्रीय अर्थसंकल्प आहे. अर्थसंकल्पासह, मोदी सरकारच्या या अर्थसंकल्पाकडून लोकांच्या अनेक अपेक्षा आहेत. काय स्वस्त होईल आणि काय महाग होईल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## सामान्य जनतेच्या आकांक्षांची पूर्तता



'केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला २०२६-२७ चा अर्थसंकल्प 'आत्मनिर्भर भारत' आणि 'विकसित भारत' या संकल्पांना नवी दिशा देणारा आहे. कर्तव्य भवनातून मांडलेला हा अर्थसंकल्प केवळ आर्थिक विकासाचा आराखडा नसून सामान्य जनतेच्या आकांक्षांची पूर्तता करणारा 'कर्तव्य दस्तऐवज' आहे. सबका साथ, सबका विकास आणि सबका विश्वास या सूत्राला धरून मांडलेला हा अर्थसंकल्प भारताला समृद्धीच्या शिखरावर नेणारा ठरेल, असा मला ठाम विश्वास आहे.'

**आमदार सुमित वानखेडे**

## विकसित भारताच्या संकल्पनेला प्रत्यक्षात उतरवणारा



लघु व मध्यम उद्योग, स्टार्टअप्स आणि स्थानिक उद्योजकांसाठी करण्यात आलेल्या तरतुदींमुळे 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनांना अधिक बळ मिळेल. सेमीकंडक्टर, जैवतंत्रज्ञान आणि आधुनिक उत्पादन क्षेत्रातील गुंतवणूक भारताला जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवणारी आहे.

राज्य सरकारांना दिलेले दीर्घकालीन आर्थिक सहाय्य आणि विकासाभिमुख धोरणांमुळे ग्रामीण व शहरी भागातील पायाभूत सुविधा अधिक मजबूत होतील. एकूणच, हा अर्थसंकल्प सामान्य नागरिकांच्या भविष्यातील गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आला असून, देशाच्या आर्थिक स्थैर्याला मजबूत करणारा आणि विकसित भारताच्या संकल्पनेला प्रत्यक्षात उतरवणारा आहे.

**सरिता गाखरे - माजी जि.प.अध्यक्षा**

## विकसित भारताकडे पाऊल टाकणारा अर्थसंकल्प- पालकमंत्री डॉ.भोयर



**वर्धा, :** केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सितारमण यांनी सादर केलेला अर्थसंकल्प देशाला नवी उर्जा देणारा असून आत्मनिर्भर विकसित भारताची वाटचाल करणारा आहे. अर्थमंत्री सितारमण यांनी अर्थसंकल्पात सर्व घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. उद्योगांना चालना देण्यासाठी १० हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

१० वर्षात २५ कोटी लोकांना गरीबीतून बाहेर काढण्याची तरतूद करण्यात आली. अपघात विम्यावरील टॅक्स आता रद्द करण्यात आला त्यामुळे सर्वसामान्यांना दिलासा मिळणार आहे. मंदिरांसाठी ५ हजार कोटीची तरतूद, महिलासाठी खास मार्टची उभारणी करण्यात येणार आहे. तथापि, महिलांना सक्षम होण्यास चालना मिळणार आहे. शेतक-यासाठी एआय टूल तयार करण्यात येणार असून पशुपालनसाठी अनुदान, शेतक-यांचे उत्पादन वाढविण्यावर भर देण्याचा संकल्प करण्यात आला आहे. शिक्षणासाठी ग्रामीण भागातून शहरात येणा-यां मुलींसाठी प्रत्येक जिल्ह्यात वसतिगृह उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. देशाला बायो हब बनविण्यासाठी पुढाकार घेण्यात आला आहे.

**डॉ. पंकज भोयर पालकमंत्री वर्धा- भंडारा जिल्हा तथा राज्यमंत्री**

## बजेट जनतेसाठी नसून केवळ प्रचारासाठी



महागाई, बेरोजगारी आणि शेतकरी प्रश्नांवर ठोस उत्तर देण्याऐवजी सरकारने फक्त आकड्यांची जुगलबंदी दाखवली आहे. युवकांच्या भविष्याबाबत सरकारकडे कोणताही स्पष्ट रोडमॅप नाही. रोजगाराच्या प्रश्नावर उत्तर देण्याऐवजी तरुणांना वारंवार गुमराह केलं जात आहे. हे बजेट जनतेसाठी नसून केवळ प्रचारासाठी मांडलेल आहे.

**विराज संजय शिंदे जिल्हाध्यक्ष, युवक कॉंग्रेस, वर्धा जिल्हा**

## अर्थसंकल्पात महागाई विरोधात कोणतेही पाऊल उचलण्यात आले नाही



आपली केंद्रातील सत्ता वाचविण्यासाठी मित्रपक्षांच्या राज्यांना या बजटमधून खुश करण्यात आले आहे तर इतर राज्याच्या हातात भोपळा देण्यात आला आहे. संपूर्ण देश हा महागाईने होरपळत आहे, मात्र अर्थसंकल्पत महागाई विरोधात कोणतेही पाऊल उचलले नाहीय. सामान्य नागरिकांसह मध्यमवर्ग[ियांनाही या बजेट मधून काहीच मिळाले नाहीय. २०१४ पासून मोदी सरकार शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव दीड पट करण्याचे आश्वासन देत आहे मात्र याही बजट मध्ये शेतकऱ्यांच्या तोंडाला पानेच पुसल्या गेली अशी प्रतिक्रीया कॉंग्रेसचे माजी मंत्री रणजित कांबळे यांनी दिली.

**माजी मंत्री रणजित कांबळे**

## देशाला भांडवलशाही व एकाधिकारशाहीकडे नेणारा वांझोटा अर्थसंकल्प - खासदार काळे



**वर्धा, :** युवकांना रोजगाराच्या कोणत्याही संधी नाही, शेतमालाला भाव नाही, शहराचे विस्तारीकरणावर उपाययोजना नाही, त्याच जुन्या योजनांना नविन साज चढवून सदर केलेला अर्थसंकल्प देशातील जनता महागाईने होरपळली असताना कोणताही दिलासा नाही. अर्थसंकल्प कुणाच्या हिताचा हा सर्वसामान्यला पडलेला मोठा प्रश्न आहे.

शेतमालाला दिडपट भाव देण्याचे आश्वासन हवेत विरले, वन्य प्राण्यांपासून, पिकांचे नुकसानीबाबत उपाययोजना शुन्य, मध्यमवर्गीय तर कुठेच नाही, हा अर्थसहाय्य निवडणुका संपल्याने तुमचे श्रम संपले असे दर्शविणारा अर्थसंकल्प असुन देशाला भांडवलशाही व एकाधिकार शाहीकडे नेणारा वांझोटा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रीया त्यांनी व्यक्त केली.

**खासदार अमर काळे**

## अर्थसंकल्पात शेतकरी वर्गाची उपेक्षा- ॲड. कोठारी



विकसित भारताचे स्वप्न पाहणारे असले तरी या अर्थसंकल्पातून मात्र शेतकरी वर्गाची उपेक्षा करण्यात आलेली आहे. असे मत ज्येष्ठ सहकार नेते ॲड सुधीर कोठारी यांनी अर्थसंकल्पावर व्यक्त केले.

यंदा अतिवृष्टीने संपूर्ण भारतात शेतकरी वर्गाचे फार नुकसान झालेले आहे. शेतमालाला बाजारपेठेत भाव नाही. हे अंदाजपत्रक विकसित भारताचे स्वप्न पाहणारे असले तरी शेतकरी वर्गाची उपेक्षा झाल्याचे मत ॲड. सुधीर कोठारी यांनी व्यक्त केले.

## बेरोजगार, शेतकरी व सर्वसामान्य नागरिक यांची दिशाभूल करणारा अर्थसंकल्प

या अर्थसंकल्पामुळे श्रीमंत अधिक श्रीमंत होणार असून झोपडपट्टीत राहणाऱ्यांचे जीवनमान खालवणार आहे. विकासाच्या नावावर बेरोजगार युवक, शेतकरी व सर्वसामान्य नागरिक यांची दिशाभूल करणारा असा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया राकाँ (शरद पवार) गटाचे जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांनी दिली आहे. हे बजेट केवळ महागाई वाढविणारे असल्याची टीका अतुल वांदिले यांनी केली आहे.



**अतुल वांदिले**

## पर्यटन क्षेत्राच्या विकासावर भर



आजच्या अर्थसंकल्पामध्ये मुलींच्या शिक्षणावर परत भर देण्यात आला असून प्रत्येक जिल्ह्यामध्ये मुलींसाठी वसतिगृह होणार आहे. आयकर दर व स्लॅब मध्ये काही बदल नाही. कृषी क्षेत्राशी संबंधित फार काही नाही. पशुपालक, दुग्ध उत्पादकांना याचा फायदा होणार आहे. कॅन्सर व मधुमेह या आजारावरील औषध स्वस्त होईल, त्यांचा मात्र फायदा सर्वसामान्यांना होईल. अर्थसंकल्पामध्ये पर्यटन क्षेत्राच्या विकासावर सुद्धा भर दिला आहे.

**डॉ. रविंद्र सोनटक्के - प्राचार्य, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आर्वी**

